# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/01/2023 (शनिवार) सायंकाळ


---

### जबरी चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा पटगोवारी फिर्यादीचे राहते घरी दिनांक २१/०१/२०२३ चे ०२.०० वा. ते ०२.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– मंजित जनार्दन बिच्छोरे, वय ३२ वर्ष, रा. पटगोवारी ता. रामटेक जि. नागपूर हा त्याचे राहाते घरी झोपला असता यातील अनोळखी तिन इसमांनी देवघराचे दाराचे कडी तोडुन आत प्रवेश करुन फिर्यादीस लोखंडी आलमारीची चाबी मागुन लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने १) सोन्याची २ अंगठी प्रत्येकी ५ ग्रॅम किंमती अंदाजे ४०,०००/–.रू. २) एक सोन्याची नथ १.५ ग्रॅम किंमती अंदाजे ६०००/–. रू. ३) चांदीची पायपट्टी १० तोळे किंमती अंदाजे ५०००/– रू. ४) रोख रक्कम २०००/–.रू. ५) फिर्यादीची आई लीलाबाई यांचे कानातले टॉप्स ५ ग्रॅम किंमती अंदाजे २००००/–रू. असा एकुण ७३,०००/–. रूपयाचा मुद्देमाल व रोख रक्कम चोरुन नेले तसेच फिर्यादीचे आईस चाकुचा धाक दाखवुन तिचे कानात घातलेले टॉप्स जबरीने चोरून नेले तसेच बाहेर पाळ ठेवलेल्या इसमाने सिटी वाजवताच आरोपी हे पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५८, ३९२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक निशा भुते पोस्टे रामटेक मो. क्र ९८२२५६६१८० या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा – दिनांक १९/०१/२०२३ चे १५.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी आपले दुकाणात गेली होती दुपारी १२.०० वा. दरम्यान ती परत आली तेव्हा फिर्यादीची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही फोनवर बोलत होती "तु कोणाशी बोंलत आहे" असे फिर्यादीने विचारले असता तिने काही सांगीतले नाही परंतु ती मोरेश्वर वाडीभस्मे रा. आष्टी याच्या सोबत फोनवर बोलायची दुपारी ०३.०० वा. फिर्यादी ही आपल्या दुकानात गेली होती तेव्हा घरी फिर्यादीचे सासरे रमेश गायधने वय ८० वर्ष हे हजर होते फिर्यादी ही सायंकाळी ०७.३० वा. दरम्यान घरी आली तेव्हा फिर्यादीची मुलगी दिसुन आली नाही त्यावरुन फिर्यादीने तिचे सासरे याना विचारणा केली असता त्यानी सांगीतले कि फिर्यादीची मुलगी ही सायंकाळी ०५.०० वा. कोणाला काहीही न सांगता घरुन निघुन गेली फिर्यादीची प्रकृती बरोबर नसल्याने फिर्यादी तिचे मागे धावु शकले नाही ती आता पर्यत आली नाही कोणीतरी अज्ञात इसमाने तिचे अपहरण करुन नेले आहे.

मुलीचे वर्णन– उंची ५ फुट रंग गोरा केस काळे बांधा सडपातळ अंगात पिवळया रंगाची जिन्स गुलाबी रंगाचे स्वेटर गुलाबी रंगाचा टॉप परिधान केलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास परी पोउपनि प्रितम पिंपळकर पो स्टे मौदा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर